# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## महाराष्ट्र राज्य, मुंबई

नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# नागरिकांची सनद

# CITIZEN'S CHARTER

- संविधानाचे पालन करणे आणि तत्प्रणीत आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
- ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फुर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.
- भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.
- आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.
- धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणा-या प्रथा सोडून देणे.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारसाचे मोल जाणून तो जतन करणे.
- अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.
- विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.
- सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
- राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे,
- हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असेल.

---

**(स्त्रोत :--भारताचे संविधान अनुच्छेद क्र. ५१-क "मूलभूत कर्तव्ये")**

# वैध मापन शास्त्र यंत्रणा

# नागरिकांची सनद

*

नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
फ्रि प्रेस जर्नल मार्ग, शासकीय कुटीर क्र. ७, मुंबई ४०० ०२१.

किंमत- ₹ ५.००

# प्रस्तावना

ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विविध कायदे व नियम अस्तित्वात आहेत. ग्राहकाने वस्तू खरेदी करण्यासाठी जे मूल्य दिले आहे त्याचे बदल्यात योग्य वजनात वा मापात वस्तू मिळणे हा सामान्य ग्राहकाचा कायदेशीर हक्क आहे. अधिनियम व नियमांतर्गत ग्राहकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी व हित जपण्यासाठी वैध मापन शास्त्र यंत्रणा कार्यरत आहे.

वैध मापन शास्त्र यंत्रणा ही सेवा देणारी शासकीय यंत्रणा आहे. या यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणारे अधिनियम व नियम यांची सामान्य जनतेस माहिती होण्यासाठी तसेच सदरील अधिनियम व नियमांतर्गत दिले जाणारे विविध परवाने, कालमर्यादा व तक्रार निवारणाबाबतच्या विषयींचे संक्षिप्त मार्गदर्शन नागरी सनदीमध्ये उपलब्ध करुन दिले आहे. या सर्व बाबींची जनतेस माहिती झाल्यास यंत्रणा अधिकाधिक लोकाभिमुख व पारदर्शी होईल तसेच यंत्रणेची जनमानसातील प्रतिमा उंचावण्यास निश्चित मदत होईल याची मला खात्री आहे.

(डॉ.माधव सानप)
विशेष पोलीस महानिरीक्षक
तथा नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**दिनांक- १९ एप्रिल, २०१२**

# विषयसूची


| अ. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | यंत्रणे मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा | १ |
| २ | यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कामे, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी व याबाबत तक्रार निवारण अधिकारी इत्यादींचा तपशील. | ४ |
| ३ | विविध परवान्यासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने | |
| | (अ) अनुसूची दोन (क), नमुना एलएम-१ | ६ |
| | (ब) अनुसूची दोन (क), नमुना एलआर-१ | १० |
| | (क) अनुसूची दोन (क), नमुना एलडी-१ | १३ |
| | (ड) अनुसूची दोन (ख), नमुना एलएम-२ | १६ |
| | (ई) अनुसूची दोन (ख), नमुना एलआर-२ | १८ |
| | (फ) अनुसूची दोन (ख), नमुना एलडी-२ | २१ |
| ४ | वापरात नसलेले वजन वा माप यांच्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना | २३ |
| ५ | आवेष्टित वस्तू नोंदणी प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना | २४ |
| ६ | संचालक/भागीदार नामनिर्देशनासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना | २५ |
| ७ | अपिल अर्जाचा नमुना (अनुसुची-१३) | २६ |
| ८ | वैध मापन शास्त्र यंत्रणेतील कार्यालयांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक | २७ |

## यंत्रणे मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा

वैध मापन शास्त्र यंत्रणे मार्फत कायदा व त्याखालील नियम यांची अंमलबजावणी करुन ग्राहकांच्या हितांचे रक्षण केले जाते. यामध्ये प्रामुख्याने वजनात किंवा मापात माल/वस्तू कमी देणे, छापील किंमतीपेक्षा जास्त दराने आवेष्टित वस्तूंची विक्री करणे, छापील किंमतीत खाडाखोड करुन ग्राहकांची फसवणूक करणे इत्यादींबाबतीत कार्यवाही करुन ग्राहकांचे हित जपले जाते. या संदर्भातील अधिनियम व नियम पुढीलप्रमाणे आहेत :—

**(१) वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९.**

**(२) वैध मापन शास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११.**

**(३) वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११.**

**(४) महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११.**

वरील अधिनियम व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करत असताना प्रामुख्याने खालील कार्ये या यंत्रणेमार्फत केली जातात.

१. **वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन**—वजन माप उपयोगकर्त्याकडील

(अ) वजने, क्षमता मापे, लांबी मापे, टेप, दांडी तराजू आणि फलक यंत्र इत्यादींची २४ महिन्यातून एकदा ;

(ब) साठवणूक टाकी पाच वर्षांतून एकदा ; व

(क) इतर सर्व वजने मापे १२ महिन्यातून एकदा पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे.

या पडताळणीसाठी उपयोगकर्त्याने आपली वजने, मापे संबंधित निरीक्षकाकडे सादर करावयाची असतात. ही वजने व मापे परवानाधारक दुरुस्तकामार्फतही सादर करता येऊ शकतात. ग्रामीण पातळीवर यासाठी निरीक्षक पूर्वनिर्धारित कालावधीमध्ये शिबीराचे आयोजन करतात.

२. **वजन माप विषयक परवाने—**

उपरोक्त अधिनियम/नियमातील तरतुदींनुसार विहीत परवाना असल्याखेरीज कोणासही वजन वा मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी खालील परवान्यांची आवश्यकता असते.

**(अ) उत्पादक परवाना देणे/नूतनीकरण—**

कोणतेही वजन वा माप, ज्यामध्ये तोलन वा मापन उपकरणांचाही समावेश होतो, यांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तसेच या परवान्याचे नूतनीकरणही याच कार्यालयाकडून करण्यात येते.

(ब) दुरुस्ती परवाना देणे—

कोणतेही वजन वा माप यांची दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तक परवाना घेणे आवश्यक आहे. दुरूस्तीचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभाग असल्यास सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. दुरूस्तीचे कार्यक्षेत्र फ़क्त प्रादेशिक विभाग असल्यास परवाना संबधित प्रादेशिक विभागाचे उप नियंत्रक यांचेकडून देण्यात येतो.

(क) दुरुस्ती परवाना नूतनीकरण—

नियंत्रक कार्यालयाने दिलेल्या फक्त दुरुस्ती परवान्याचे नूतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या प्रादेशिक विभागात आहे त्या प्रादेशिक विभागाचे उप नियंत्रक यांचेकडून केले जाते. प्रादेशिक विभाग उप नियंत्रक यांनी दिलेल्या परवान्याचे नूतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या जिल्ह्यामध्ये आहे, त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून केले जाते.

(ड) विक्री परवाना देणे/नूतनीकरण—

कोणतेही वजन वा माप यांची विक्री करण्यासाठी विक्री परवाना घेणे आवशक आहे. यासाठी अर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक यांचेकडून विक्री परवाना देण्यात येतो, तसेच या परवान्याचे नूतनीकरणही त्यांचेकडूनच करण्यात येते.

वरील सर्व परवान्यासाठी / परवाना नूतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये विहीत करण्यात आलेले असून सोबत देण्यात आलेले आहेत.

इच्छूक व्यक्तींनी परवाना मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज करावयाचा असतो. अर्जाच्या छाननी नंतर जर इच्छूक व्यक्ती परवाना मिळण्यास पात्र आढळली तर त्यास विहित शुल्काचा भरणा केल्यानंतर परवाना दिला जातो. वरील सर्व परवाने सुरुवातीस एक कॅलेंडर वर्षासाठी देण्यात येतात. परवान्यांचे नूतनीकरण करण्यासाठीचा अर्ज परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ३० दिवस अगोदर करावा लागतो. अन्यथा त्यास नियमीत शुल्कासह ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारुन नियंत्रकाच्या मान्यतेने परवान्याच्या विहित मुदतीत नूतनीकरण करण्यासाठी अर्ज करता येतो, तथापि, एक महिन्याची वाढीव मुदत संपेपर्यंत परवानाधारकाने नूतनीकरणासाठी अर्ज केला नाही तर त्याचा परवाना रद्द होतो.

(इ) आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार नोंदणी—

आवेष्टित वस्तूंचे उत्पादन/आवेष्टन/आयात करणाऱ्या सर्वांना याबाबतची नोंदणी करणे बंधनकारक आहे. यासाठी आयातदार, उत्पादक वा आवेष्टक प्रायव्हेट लिमिटेड व लिमिटेड संस्था, यांची नोंदणी नियंत्रक कार्यालयात करण्यात येते व इतर सर्वांची नोंदणी नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याचे सहायक नियंत्रक कार्यालयात करण्यात येते. यासाठीच्या अर्जाचा नमुना सोबत देण्यात आलेला आहे.

**(फ) आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्त्याची नोंदणी करणे—**

आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्त्याची नोंदणी, नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

३. **वजन वा माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतुदींचा भंग—**

खोटया वजनमापांचा वापर, वजनात कमी माल देणे, अधिक मालाची मागणी करणे, आवेष्टित वस्तुंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, त्यावरील मूळ किंमतीमध्ये खाडाखोड करणे, पाकिटावर घोषित निव्वळ वजन वा माप पेक्षा माल कमी आढळणे, आवेष्टित वस्तूवर आवश्यक उदघोषणा न छापणे इत्यादी बाबींमध्ये ग्राहकांची व सर्वसाधारण जनतेची फसवणूक होत असल्याचे आढळून आल्यास वा वैध मापन शास्त्र विषयक तरतुदींचा भंग होत असल्यास निरीक्षक संबंधितांविरुद्ध कारवाई करतात. ग्राहकास व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास अथवा याबाबतीत तक्रारी असल्यास तक्रार नोंदविण्यासाठी यंत्रणेने स्वतंत्र दूरध्वनी (०२२-२२८८६६६६) उपलब्ध करून दिलेला आहे. याव्यतिरिक्त माहितीसाठी व तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र

संकेत स्थळ "legalmetrology.maharashtra.gov.in" व

e-mail:—"dclmms@yahoo.in"

ग्राहकासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. जिल्हापातळीवर तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा सहायक नियंत्रक यांचे दूरध्वनी क्रमांक संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून त्यांची त्वरित दखल घेतली जाते व तरतुदींचा भंग झाला असल्यास अपराध्यांविरुध्द खटला नोंदविण्यात येतो. अधिनियमातील व नियमातील तरतुदींनुसार प्रशमन करता येत असलेले खटले संबंधिताने विनंती केल्यास तडजोडीने मिटविण्यासाठी आदेशित प्रशमन रक्कम शासन जमा करण्याच्या अटीस अधिन राहून प्रशमित करण्यात येतात किंवा सदर खटले न्यायालयात दाखल केले जातात. त्याचप्रमाणे याबाबत विनंतीनुसार तक्रारदारासही कळविण्यात येते.

**यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कामे, जबाबदार अधिकारी, कार्यपूर्ती कालावधी व याबाबत तक्रार निवारण अधिकारी इत्यादींचा तपशील**

| अ.क्र. | कार्यसूची | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी | कार्यपूर्तीचा कालावधी | विहीत मुदतीत कार्यपूर्ती न झाल्यास कोणत्या अधिकाऱ्याकडे तक्रार करावी. |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | वजन माप उत्पादक. दुरुस्तक, विक्रेते यांच्या गैरवर्तणुकी बाबतच्या तक्रारी. | उप नियंत्रक | १ महिना | नियंत्रक |
| २. | कार्यालयीन/शिबीर कार्यालयातील वजन मापांच्या पडताळणीबाबत. | निरीक्षक | त्याच दिवशी व/किंवा लगतच्या कार्यालयीन दिवशी | सहायक नियंत्रक |
| ३. | वजन माप उत्पादकांना उत्पादन. विक्री व दुरुस्ती अर्जानुसार परवाना देणे, नूतणीकरण करणे तसेच महाराष्ट्र राज्य किंवा एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभागांसाठी दुरुस्ती परवाना देणे, (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास). | उप नियंत्रक, मुख्यालय | ४५ दिवस | नियंत्रक |
| ४. | वजन माप दुरुस्तक यांना प्रादेशिक विभागासाठी अर्जानुसार परवाना देणे (संपुर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास). | प्रादेशिक उप नियंत्रक | ४५ दिवस | नियंत्रक |
| ५. | संबंधित जिल्हयात नोंदणीकृत आस्थापना /कार्यशाळा असणारे वजन माप विक्रेते यांना अर्जानुसार परवाना देणे नूतणीकरण करणे व संबंधित जिल्हयात नोंदणीकृत आस्थापना/कार्यशाळा असणारे व उप नियंत्रक यांनी दिलेले वजन माप दुरुस्तक परवाने यांचे नूतनीकरण करणे. (संपूर्ण कागदपत्रांसह अर्ज केल्यास). | जिल्हा सहायक नियंत्रक | ४५ दिवस | प्रादेशिक उप नियंत्रक |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६. | आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/ आयातदार यांची नोंदणी. | उप नियंत्रक, मुख्यालय/ जिल्हा सहायक नियंत्रक. | ७ दिवस | नियंत्रक/ विभागीय उप नियंत्रक. |
| ७. | वजन माप विषयक तरतुदीच्या भंगाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी. | निरीक्षक | ७ दिवस | सहायक नियंत्रक. |
| ८. | कनिष्ठ कार्यालयाचे आदेश/निर्णय विरुध्दच्या अपीलाबाबतची संपूर्ण कार्यवाही. | नियत्रक | १ महिना | शासन |

(शा.म.मु.) आरडी २८३५—३ (२,५००—३–२०१२)

## विविध परवान्यांसाठी करावयाच्या अर्जाचे नमुने

विविध परवान्यांसाठी लागणारे नमुने नागरिकांच्या सुविधेसाठी खालीलप्रमाणे आहेत :—

मालक/व्यवस्थापकीय भागीदार/व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वसाक्षांकित छायाचित्र चिकटवावे.

### अनुसूची दोन (क)

नमुना एलएम-१

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(१) अन्वये वजन वा माप यांचे ' उत्पादक ' म्हणून लायसन्ससाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणी अधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १ जिच्यासाठी लायसन्स पाहिजे असेल त्या उत्पादक संस्थेचे नाव | | |
| २ संबंधित संस्थेचा पूर्ण पत्ता | | |
| ३ वास्तू मालकीची/भाड्याची/ भाडेपट्टीने घेतलेली/संमती-नि-परवानगीची आहे किंवा कसे ? (पुष्टीदाखल दस्त-ऐवज जोडावेत) | | |
| ४ संबंधित संस्थेच्या स्थापनेचा दिनांक | | |
| ५ मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहीत नावे/ व पत्ता/ पत्ते | | |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| ६ कारखाना अधिनियम/दुकाने व आस्थापना अधिनियम, महानगरपालिका व्यापारी लायसन या अन्वयेचा लायसन नोंदणी क्रमांक व दिनांक | | |
| ७ सध्या करीत असलेल्या व्यवसायाचे स्वरूप | | |
| ८ नियोजीत उत्पादन करावयाच्या वजन वा माप यांचे प्रकार. | | |
| ९ काम करणाऱ्या/काम करण्या-साठी प्रस्तावित केलेल्या कामगारांची संख्या | | |
| (एक) कुशल | | |
| (दोन) अर्ध-कुशल | | |
| (तीन) अकुशल | | |
| (चार) या विषयातील विशेषज्ञ | | |
| १०. अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांची नावे व त्यांची शैक्षणिक अर्हता | | |
| ११. वजन वा माप यावर काही आद्याक्षर, मुद्रा किंवा बोधचिन्ह उमटवावयाचे असल्यास त्याची माहिती. | | |
| १२. वजन वा माप इत्यादींच्या उत्पादनासाठी उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री, अवजारे व उपसाधने यांच्यासंबंधी तपशील. | | |
| १३. उपलब्ध असलेल्या ओतशाळा/कार्यशाळा इत्यादी मग ती स्वत:च्या मालकीची किंवा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टीवर असेल, त्याचा तपशील | | |

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| १४. महत्त्वाच्या सुट्ट्या भागाचे किंवा अन्य साधनांची काठिण्य चाचणी घेण्याच्या तसेच पोलाद ओतकामा-विषयक सोयी. | | |
| १५. वीजपुरवठ्याची उपलब्धता | | |
| १६. आपणास शासनाकडून किंवा वित्तीय संस्थेकडून काही कर्ज मिळाले आहे काय, असल्यास त्यासंबंधी तपशील द्यावा. | | |
| १७. बँकर्स असल्यास त्यांची नावे | | |
| १८. मूल्यवर्धीत कर/विक्रीकर नोंदणी क्रमांक सीएसटी क्रमांक/व्यवसाय कर नोंदणी क्रमांक/आयकर क्रमांक | | |
| १९ आपण यापूर्वी मालाच्या उत्पादनासाठीच्या लायसन-करिता अर्ज केला होता काय असल्यास केंव्हा व त्याविषयीचा निष्कर्ष | | |
| २० (क) उत्पादन करण्यासाठी प्रस्तावित केलेली वस्तू यांची राज्यात विक्री केली जाणार आहे की, राज्याबाहेर किंवा दोन्ही ठिकाणी केली जाणार आहे. | | |
| (ख) भारत सरकारकडून मान्यताप्राप्त झालेल्या प्रतिमानाचा तपशील | | |
| (ग) ज्या मालाच्या लायसन-करिता आपण अर्ज केला आहे त्या मालाचे नमुने निरीक्षणा-करिता आपण कधी सादर करू शकता ? | | |

## अर्जदाराने/अर्जदारांनी प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की मी/आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही आणि पदनाम)

## राज्य शासनाच्या विभागीय अधिकाऱ्याने भरण्यासाठी.

अर्ज मिळाल्याचा दिनांक :

अर्जाचा अनुक्रमांक :

तपासणीचा दिनांक :

तपासणी अधिकाऱ्याची शिफारस :

ठिकाण :

दिनांक :

(तपासणी अधिकाऱ्याची सही व पदनाम)

## लायसन प्राधिकाऱ्याचे अंतिम आदेश

लायसन देण्यात आले/नाकारले :

लायसन क्रमांक :

...................................................................पर्यंत विधिग्राह्य

ठिकाण :

दिनांक :

(सही आणि पदनाम)

| मालक/व्यवस्थापकीय भागीदार/व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वसाक्षांकित छायाचित्र चिकटवावे |
|---|

## अनुसूची दोन (क)

नमुना एलआर-१

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम २०११ च्या नियम ६(१) अन्वये वजन वा माप यांचे ' दुरुस्तक ' म्हणून लायसन्ससाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणी अधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १. लायसन मागणाऱ्या संबंधितांचे नाव | | |
| २. संबंधितांच्या कार्यशाळेचा संपूर्ण पत्ता | | |
| ३. जागा स्वत:च्या मालकी/ भाड्याची भाडेपट्ट्यावर घेतलेली/ संमती-नि-परवानगी तत्त्वावर घेतेलेली आहे काय ? याला आधार देणारी कागदपत्रे जोडावी. | | |
| ४. संस्थेच्या स्थापनेचा दिनांक | | |
| ५. मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहीत नावे/ व पत्ता पत्ते | | |
| ६. कारखाना अधिनियम दुकाने व आस्थापना अधिनियम, महानगर पालिका व्यापारी लायसन या अन्वयेचा लायसन नोंदणी क्रमांक व दिनांक. | | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७. व्यवसाय कर/आयकर नोंदणी क्रमांक इत्यादी असल्यास तो— | | |
| ८. दुरुस्त करावयाचे योजिलेल्या वजन वा मापाचा प्रकार | | |
| ९. आपण कार्य करु इच्छिणाऱ्या क्षेत्राचे नाव. | | |
| १०. या व्यवसायातील पूर्वीचा अनुभव असल्यास तो. | | |
| ११. कार्यशाळेत नियुक्त केलेल्या/करावयाच्या कारागिरांची संख्या | | |
| (एक) कुशल | | |
| (दोन) अर्ध कुशल | | |
| (तीन) अकुशल | | |
| (चार) या विषयातील विशेषज्ञ | | |
| १२. अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांची नावे व शैक्षणिक अर्हता. | | |
| १३. उपलब्ध यंत्रसामुग्री, अवजारे व उपसाधने यांच्या संबंधित तपशील | | |
| १४. विजेची उपलब्धता | | |
| १५. (एक) उधार उसनवारीवर देण्यासाठी वस्तू | | |
| (दोन) चाचणीसाठी घेतलेल्या वस्तू यांचा तपशील. | | |
| १६. दुरुस्ती करण्याचे लायसन मिळण्यासाठी यापूर्वी तुम्ही अर्ज केला होता काय? असल्यास, केव्हा ? व त्याचा निष्कर्ष. | | |

## अर्जदाराने/अर्जदारांनी प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की, मी/आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक : (सही आणि पदनाम)

### राज्य शासनाच्या विभागीय अधिकाऱ्याने भरण्यासाठी

अर्ज मिळाल्याचा दिनांक :

अर्जाचा अनुक्रमांक :

तपासणीचा दिनांक :

तपासणी अधिकाऱ्याची शिफारस :

ठिकाण :

दिनांक :

(तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम)

### लायसन प्राधिकाऱ्याचे अंतिम आदेश

लायसन देण्यात आले/नाकारण्यात आले :

लायसन क्रमांक

.......................................................................पर्यंत विधिग्राह्य

ठिकाण :

दिनांक

(स्वाक्षरी आणि पदनाम)

| मालक/व्यवस्थापकीय भागीदार/व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वसाक्षांकित छायाचित्र चिकटवावे |
|---|

## अनुसूची दोन (क)

नमुना एलडी-१

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(१) अन्वये वजन वा माप यांचा विक्रेता म्हणून लायसन्ससाठी करावयाच्या अर्जाचा नमुना.—

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणी अधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १. लायसन्स मागणाऱ्या संबंधितांचे नाव. | | |
| २. संबंधितांच्या कार्यशाळेचा संपूर्ण पत्ता. | | |
| ३. जागा स्वत:च्या मालकी/भाड्याची/भाडे पट्ट्यावर घेतलेली/संमती-नि-परवानगी तत्त्वावर घेतलेली आहे काय? याला आधार देणारी कागदपत्रे जोडावी. | | |
| ४. संस्थेच्या स्थापनेचा दिनांक | | |
| ५. मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील/पतीच्या नावासहीत नावे/ व पत्ता/पत्ते. | | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ६. विक्री करावयाच्या वजन वा मापाचा प्रवर्ग. | | |
| ७. मूल्यवर्धित कर/सीएसटी, विक्रीकर/व्यवसाय कर/ आयकर नोंदणी क्रमांक. | | |
| ८. राज्याबाहेरील /देशाबाहेरील ठिकाणावरून वजन वा माप इ. ची आयात करण्याचा तुमचा उद्देश आहे काय असल्यास पुरवठा स्त्रोतांचा निर्देश करावा. (उत्पादकांचे व्यापारचिन्ह आद्याक्षरमुद्रा आणि त्याचा लायसन्स क्रमांक यांचा तपशील द्यावा) | | |
| (क) वजन वा माप यांचा आयातदार असल्यास त्याच्या नोंदणीचा तपशील. | | |
| (ख) भारतात आयात केलेल्या वजन वा माप यांच्या प्रतिमानास भारत सरकार कडून दिलेली मान्यता याबाबतचा तपशील. | | |
| ९. तुम्ही विक्रेता लायसन्ससाठी यापूर्वी अर्ज केला होता काय ? असल्यास, केव्हा व त्याचा निष्कर्ष काय ? | | |

## अर्जदाराने प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की मी/ आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन्स अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन्स फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक :

(सही आणि पदनाम)

राज्य शासनाच्या विभागीय अधिकाऱ्याने भरावयाचे.

अर्ज मिळाल्याचा दिनांक :

अर्जाचा अनुक्रमांक :

तपासणीचा दिनांक :

तपासणी अधिकाऱ्याची शिफारस :

(तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम)

लायसन्स प्राधिकाऱ्याचे अंतिम आदेश

लायसन्स देण्यात आले/नाकारण्यात आले :

लायसन क्रमांक :

दिनांक

.....................................................................पर्यंन्त वैध

ठिकाण :

दिनांक :

(स्वाक्षरी आणि पदनाम)

## अनुसूची दोन (ख)

नमुना एलएम-२

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(२) अन्वये वजन वा माप यांचा **उत्पादक** लायसन्सच्या **नूतनीकरणासाठी** करावयाच्या अर्जाचा नमुना.—

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणीअधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १. उत्पादक लायसन्सचे नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता. | | |
| २. उत्पादक संस्थेचा लायसन्स क्रमांक. | | |
| ३. मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहित नावे/ व पत्ता/पत्ते. | | |
| ४. जागा स्वत:च्या मालकी/ भाड्याची/भाडेपट्ट्यावर घेतलेली/संमती-नि-परवानगी तत्त्वावर घेतलेली आहे काय ? याला आधार देणारी कागदपत्रे जोडावी. | | |
| ५. (क) देण्यात आलेल्या लायसन्सनुसार उत्पादित वजन वा मापांचा प्रकार. (ख) कोणताही बदल करण्याचा उद्देश आहे काय ? | | |
| ६ आपण उत्पादित केलेल्या वजन व मापांवर वापरण्यात येणारी आद्याक्षर मुद्रा किंवा बोधचिन्ह यांची माहिती. | | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७. कार्यशाळेतील उपलब्ध सोयीसुविधेचा तपशील. | | |
| ८. मागील ५ वर्षांचा उत्पादन व विक्रीचा तपशील. | | |
| ९. कंपनी अधिनियम, दुकाने व आस्थापना अधिनियम, नगरपालिका व्यापारी लायसन्सअन्वये लायसन्सचा नोंदणी क्रमांक व दिनांक. | | |
| १०. वॅट/विक्रीकर/सीएसटी/ व्यवसाय कर/आयकर यांचा नोंदणी क्रमांक. | | |
| ११. लायसन्स दिल्यापासून किंवा लायसन्सचे नूतनीकरणा-पासून संस्थेच्या घटनेमध्ये किंवा अर्हताप्राप्त कर्मचारी वर्गामध्ये कोणताही बदल झाला असेल तर त्याचा तपशील. | | |

अर्जदाराने प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की मी/ आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन्स अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन्स फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक :

(स्वाक्षरी आणि पदनाम)

## अनुसूची दोन (ख)

### नमुना एलआर-२

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(२) अन्वये वजन वा माप यांचा **दुरुस्ती** लायसन्सच्या **नूतनीकरणासाठी** करावयाच्या अर्जाचा नमुना.—

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणीअधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १. दुरुस्ती लायसन्सचे नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता. | | |
| २. दुरुस्तकाचा लायसन्स क्रमांक | | |
| ३. मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्याबाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहित नावे / व पत्ता/पत्ते. | | |
| ४. कंपनी अधिनियम, दुकाने व आस्थापना अधिनियम, नगरपालिका व्यापारी लायसन्स अन्वये लायसन्सचा नोंदणी क्रमांक व दिनांक. | | |
| ५. जागा स्वत:च्या मालकी/भाड्याची/भाडे पट्ट्यावर घेतलेली/संमती-नि-परवानगी तत्त्वावर घेतेलेली आहे काय ? याला आधार देणारी कागदपत्रे जोडावी. | | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ६. वॅट/विक्रीकर/सीएसटी/ व्यावसाय कर/आयकर यांचा नोंदणी क्रमांक. | | |
| ७. सेवा कर नोंदणी क्रमांक | | |
| ८. (क) देण्यात आलेल्या लायसन्सनुसार दुरुस्ती केलेल्या वजन वा मापाचा प्रकार. | | |
| (ख) कोणताही बदल करण्याचा कोणताही उद्देश आहे का ? | | |
| ९. आपण कार्यरत असलेले कार्यक्षेत्र. | | |
| १०. (क) उधार उसनवारीवर देण्यासाठी वस्तू. | | |
| (ख) चाचणीसाठी घेतलेल्या वस्तू यांचा तपशील. | | |
| ११. मागील ५ वर्षांचा दुरुस्ती व मुद्रांकन यांचा तपशील द्यावा. | | |
| १२. लायसन्स दिल्यापासून किंवा लायसन्सचे नूतनीकरणा-पासून संस्थेच्या घटनेमध्ये किंवा अर्हताप्राप्त कर्मचारी वर्गामध्ये कोणताही बदल झाला असेल तर त्याचा तपशील. | | |

## अर्जदाराने प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की मी/ आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक :

(स्वाक्षरी आणि पदनाम)

## अनुसूची दोन (ख)

### नमुना एलडी-२

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ६(२) अन्वये वजन वा माप यांचा विक्रेता लायसन्सच्या नूतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रती,

| तपशील (१) | अर्जदाराने भरावयाचे (२) | तपासणी अधिकाऱ्याची टिप्पणी (३) |
|---|---|---|
| १. विक्रेता लायसनचे नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | | |
| २. विक्रेता लायसन क्रमांक | | |
| ३. मालक/भागीदार/मर्यादित कंपनीच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालक किंवा संचालक यांचे/यांची त्यांच्या वडील / पतीच्या नावासहीत नावे/ व पत्ता/पत्ते | | |
| ४. कंपनी अधिनियम, दुकाने व आस्थापना अधिनियम, नगरपालीका व्यापारी लायसन अन्वये लायसनचा नोंदणी क्रमांक व दिनांक | | |
| ५. जागा स्वत:च्या मालकी / भाडयाची/भाडेपट्टयावर घेतलेली/संमती-नि-परवानगी तत्त्वावर घेतलेली आहे काय ? याला आधार देणारी कागदपत्रे जोडावी. | | |
| ६. सध्या विक्री करण्यात येत असलेल्या वजन व मापाचा प्रवर्ग | | |
| ७. मागील ५ वर्षाचा वजन वा माप यांच्या विक्रीचा तपशील | | |
| ८. वॅट/विक्रीकर/सीएसटी/ व्यवसाय कर/आयकर नोंदणी क्रमांक | | |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९. राज्याबाहेरील/देशाबाहेरील ठिकाणाहून वजन इत्यादी आयात करण्याचाआपला उद्देश आहे काय असेल तर पुरवठा स्त्रोत निर्देशित करावा. (उत्पादक करणाऱ्याचे आद्याक्षर मुद्रा/बोधचिन्ह आणि त्याचा लायसन क्रमांक याचा तपशील द्यावा आणि तशी तरतूद करावी. ) | | |
| (क) वजन वा माप यांचा आयातदार असल्यास त्याच्या नोंदणीचा तपशील. | | |
| (ख) भारतात आयात केलेल्या वजन वा माप यांच्या प्रतिमानास भारत सरकार कडून दिलेली मान्यता. याबाबतचा तपशील. | | |

अर्जदाराने प्रमाणित करावयाचे

मी/आम्ही असे प्रमाणित करतो की मी/ आम्ही वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ वाचला आहे आणि त्याचे आणि त्यासाठी काढण्यात आलेले किंवा काढण्यात येतील असे प्रशासकीय आदेश/अनुदेश यांचे पालन करण्याचे कबूल करतो.

मी/आम्ही लायसन अधिकारी भाग पाडतील तेव्हा निर्देशित लायसन फी शासनाकडे तात्काळ जमा करण्याचे कबूल करतो.

सादर केलेली संपूर्ण माहिती माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी आहे.

ठिकाण :

दिनांक :

(स्वाक्षरी आणि पदनाम)

## वापरात नसलेल्या वजन वा माप यांच्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना

[महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधिल नियम-१५(३)]

वापरात नसलेल्या वजन वा मापाच्या संबंधातील तपशील

(१) उपयोगकर्त्याचे नाव व पत्ता. :

(२) व्यवसायाचे स्वरुप. :

(३) वजन वा मापाचा प्रकार व संख्या. :

(४) उत्पादकाचे नाव. :

(५) क्षमता :

(६) वर्ग :

(७) मशीन अनुक्रमांक - :

(८) मागील पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :

(९) वापर न करण्याचे कारण :

मी/आम्ही ______________________________ (नाव व पदनाम) याद्वारे घोषित करतो की, पडताळणी व मुद्रांकन वैधतेशिवाय वजन वा मापाचा वापर करणे हा वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याखालील नियमानुसार गुन्हा आहे याची मला/आम्हाला जाणीव आहे. मी /आम्ही वरील वजन वा माप उपयोगात आणण्यापूर्वी आपल्याकडून फेरपडताळणी व मुद्रांकन करून घेतल्याशिवाय वापर करणार नाही.

दिनांक :

उपयोगकर्त्याची स्वाक्षरी व शिक्का

## आवेष्टित वस्तू नोंदणी प्रमाणपत्रसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

**महाराष्ट्र शासन**

(वैध मापन शास्त्र यंत्रणा)

वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ च्या नियम २७ अन्वये उत्पादक/आवेष्टक/आयातदार नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाचा अर्ज.

प्रति,

नियंत्रक/ सहायक नियंत्रक,

वैध मापन शास्त्र, -----------------

---

१. अर्जदाराचे नाव :
Name of the Applicant

२. आवेष्टन/आयात करण्याच्या ठिकाणांचा पूर्ण पत्ता :
CompleteAdresses of the premises At which the pre-packing or import to be taken place.

३. आवेष्टन/आयात करावयाच्या वस्तू :
Name(s) of the commodities to be Pre-Packed/Imported

४. नामनिर्देशित व्यक्ती/भागीदार/संचालक/ मालक यांची नांवे :
Name(s) of the Nominated Person/ Partners/ Directors/Propriter

दिनांक (Date) :

ठिकाण (Place) :

सही/पदनाम/शिक्का.

Signature/Designation/Seal

संचालक/भागीदार नामनिर्देशनसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना
(दोन प्रतीत सादर करणे)

## SCHEDULE XIII

Format for nomination of Director/ persons by the Company
[*Rule 29*]

Notice is hereby given that Shri/ Smt./ Ms ................................ Director of the ............................................. (name of the company) has been nominated by the company by a Resolution passed at their meeting held on ...................... at ................................ to be in charge of, and responsible to, the said company for the conduct of the business of the said company or ............................................ establishment/ branch/ unit thereof and authorized to exercise all such powers and take all such steps as may be necessary or expedient to prevent the commission by the said company any offence under the Legal Metrology Act 2009.

A certified copy of the said Resolution is enclosed.

Place:................ Managing Director/Secretary of
Date:................. (name of the company)

*Note.*— Strike out the portion which is not applicable.

I accept the above nomination in pursuance of sub-section (2) of Section 49 of the Legal Metrology Act, 2009 and Rule 29 of the Legal Metrology (General) Rules, 2011 made thereunder.

Place:................ Director of
Date:................. (name of the company)

**अपिल अर्जाचा नमुना**

अनुसुची - १३

**महाराष्ट्र शासन**

(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)

वैध मापन शास्त्र यंत्रणा

वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९

महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम २४(१)

नियंत्रक किंवा वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याने दिलेल्या आदेश किंवा निर्णय या विरूध्द करावयाच्या अपिल अर्जाचा नमुना

(१) अपिलकर्त्याचे नाव व पत्ता :

(२) नियंत्रक किंवा वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याने दिलेला जो आदेश किंवा निर्णय या विरूध्द अपिल करण्यात येत आहे त्याचा क्रमांक व दिनांक :
(आदेश/निर्णय प्रत जोडावी)

(३) अपिलकर्ता सुणावणीसाठी स्वत: उपस्थित राहू इच्छितो वा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत सुणावणी करू इच्छितो :

(४) अपिलाची कारणे :

ठिकाण :

दिनांक : अपिलकर्त्याची स्वाक्षरी

## वैध मापन शास्त्र यंत्रणेतील कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक

| अ.क्र (१) | कार्यालयाचे नाव (२) | कार्यालयाचा पत्ता (३) | दुरध्वनी क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| १ | नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | शासकीय कुटीर क्र.७. फ्रि प्रेस जर्नल मार्ग. मुंबई - २१ | ०२२-२२०४४९५२<br>०२२-२२०४५७०६ |
| २ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग. | प्लॉट क्र.सी.एस.४/२९६(पी.टी) रेल शिवडी डिव्हीजन, ३रा माळा, एस.एस.राव रोड, महात्मा गांधी रुग्णालयाजवळ, परेल, मुंबई-१२. | ०२२-२४१४ ८४९४ |
| ३ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोंकण विभाग. | ६वा माळा, कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४ | ०२२-२७५७ ४०७४ |
| ४ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, पुणे विभाग. | बंगला नं.१६, भिमाशंकर वसाहत, गुंजन सिनेमाजवळ, येरवडा, पुणे ०६ | ०२०-२६६९ ७२३२ |
| ५ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नाशिक विभाग. | बॅरेक नं. १६, आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, नाशिक. | ०२५३-२३३९६५६ |
| ६ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, औरंगाबाद विभाग. | घर क्र.२-५-८८/२, डॉ. पेंडकर हॉस्पीटलमागे, ज्युबली पार्क, औरंगाबाद ४३१ ००१. | ०२४०-२३३९६५६ |
| ७ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, अमरावती विभाग. | आयुक्त कार्यालय, अमरावती | ०७२१-२६६३२९१ |
| ८ | उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नागपूर विभाग. | आयुक्त कार्यालय, रूम नं.६४, नागपूर. | ०७१२-२५४०२९२ |
| ९ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र मुंबई जिल्हा क्र.१. | प्लॉट क्र.सी.एस.४/२९६(पी.टी) रेल शिवडी डिव्हीजन, ३रा माळा, एस. एस. राव रोड, महात्मा गांधी रुग्णालयाजवळ, परेल, मुंबई-१२. | ०२२-२४१५६९१० |
| १० | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई जिल्हा क्र.२. | पत्ता वरिलप्रमाणे | ०२२-२४१७३५२ |
| ११ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई जिल्हा क्र.३. | पत्ता वरिलप्रमाणे | ०२२-२४१२६०७६ |
| १२ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई जिल्हा क्र.४. | पत्ता वरिलप्रमाणे | ०२२-२४१५७४६५ |
| १३ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, ठाणे जिल्हा. | सोनटक्के पथिकाश्रम, ३रा मजला, नवपाडा, कोपरी रोड, सिग्नलजवळ, ठाणे ४०० ६०२. | ०२२-२५४०७३३२ |


## वैध मापन शास्त्र यंत्रणेतील कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १४ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, रायगड जिल्हा. | ८५५, बाजार पेठ, कणकेश्वर राईस मिलसमोर, अलिबाग, जिल्हा रायगड. | ०२१४१-२२४४९८ |
| १५ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हे. | ४२२, सुभाश पथ, पतित पावन मंदिराचे आवार, रत्नागिरी ४१५ ६१२ | ०२३५२-२२०८५५ |
| १६ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नाशिक जिल्हा. | शितल सोसायटी, १६ कांचन बगला, टाकळी रोड, शंकर नगर शेजारी, नाशिक | ०२५३-२५९०७२३ |
| १७ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, अहमदनगर जिल्हा. | दि. अहमदनगर गॅस एजन्सी मागे, शहाजी रोड, तांबरकर लेन, अहमदनगर. | ०२४१-२३४३२५३<br>०२५६२-२३६१४९ |
| १८ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, धुळे-नंदुरबार जिल्हे. | कोषागार कार्यालयासमोर, प्रशासकीय संकुल, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे. | |
| १९ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, जळगाव जिल्हा. | मंडोरे मार्केट, जिल्हा पेठ, जळगाव आंबेडकर मार्केटच्या पाठीमागे. | ०२५७-२२४११४९ |
| २० | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, पुणे जिल्हा. | ८९२, सिने गॉगरोड, आशिर्वाद हॉल, मंगल कार्यालय, पुणे कॅम्प- १. | ०२०-२६१३७११४ |
| २१ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, सातारा जिल्हा. | ५६-अ, ब-५७, रविवार पेठ, पंतांचा गोठा, सातारा. | ०२१६२-२३२१४३ |
| २२ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, सांगली जिल्हा. | शिवसदन प्लॉट क्र.७, लोकन बोर्ड कॉजनी, सांगली मिरज रोड, सांगली. | ०२३३-२६७२७९० |
| २३ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, सोलापूर जिल्हा | उजनी वसाहत, अंतीम भूखंड, ४१ ई, गुरुनानक नगर जवळ, सोलापूर. | ०२१७-२६०१९४९ |
| २४ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोल्हापूर जिल्हा. | हत्तीमल रोड, मटण मार्केट जवळ, कोल्हापूर. | ०२३१-२५४२५४९ |
| २५ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, औरंगाबाद जिल्हा. | प्लॉट क्र.३, सपना इमारत, चिंतामणी कॉलनी, सतीष मोटारच्यामागे, अदालत रोड, औरंगाबाद. | ०२४०-२३३३८१८ |
| २६ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, जालना जिल्हा. | स्टोअरवेज आर्केड, सि.टी.एम.ए. हायस्कूल समोर, जालना. | ०२४८२-२३०७४३ |
| २७ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, बीड जिल्हा. | घर क्र.१-६-१२६४, प्रतिक्षा निवास, शिवाजी कोळेश्वर यांचे घर, आदर्श नगर, बीड. | ०२४४२-२२२४१७ |
| २८ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नांदेड जिल्हा. | बंदाघाट रोड, घर क्र.२१२/३१७, वजिराबाद, नांदेड ४३१ ६०१. | ०२४६२-२३३८८१ |

**वैध मापन शास्त्र यंत्रणेतील कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक—(समाप्त)**

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २९ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, परभणी-हिंगोली जिल्हे. | नखाते बिल्डींग, गव्हाणे रोड, जि. परभणी. | ०२४५२-२२१२५८ |
| ३० | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, लातूर-उस्मानाबाद जिल्हे. | मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, तळमजला, शिवाजीनगर लातूर, जिल्हा लातूर. | ०२३८२-२४५२०७ |
| ३१ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, अमरावती जिल्हा. | संजिव बोराडे हॉस्पिटलच्या बाजूला, चपराशी पुरा, आनंद स्टेट बँक कॉलनी, अमरावती. | ०७२१-२६६३०८९ |
| ३२ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, यवतमाळ जिल्हा. | द्वारा.—लक्ष्मी निवास, अभ्यंकर शाळेच्या बाजूला, श्री. मोहन महाजन यांचा वाडा, वार्नाहर कॉलनी रोड, यवतमाळ. | ०७२३२-२४२१५७ |
| ३३ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, अकोला-वाशिम जिल्हे. | ए-१८, ऑटो स्टॉपच्या समोर, द्वारा.—प्रमोद कसदन लव्हाळे यांचे घर, सुधीर कॉलनी, अकोला. | ०७२४-२४०१४९४ |
| ३४ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, बुलढाणा जिल्हा. | श्री. डीबने यांची इमारत, वानखेडे लेआऊट, वार्ड क्र.२८, जिल्हा बुलढाणा. | ०७२६२-२४२९०६ |
| ३५ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नागपूर-वर्धा जिल्हे. | नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, ५वा माळा, ए-विंग, जी.पी.ओ. समोर, नागपूर ४४० ००१. | ०७१२-२५४७३०२ |
| ३६ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, भंडारा-गोंदीया जिल्हे. | राजगोपालचारी वार्ड, तारघर मार्ग, भंडारा, जिल्हा भंडारा ४४१ ९०४ | ०७१८४-२५४२८५ |
| ३७ | सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, चंद्रपूर-गडचिरोली जिल्हे. | रामनगर, बोकारे प्लॉट, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर. | ०७१७२-२५२५३९ |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई




**नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यलय**

फ्रि प्रेस जर्नल मार्ग, शासकीय कुटीर क्र. ७, मुंबई- ४०० ०२१

संकेत स्थळ :"legalmetrology.maharashtra.gov.in"